मुख्य कार्यालय, विरार
विरार (पूर्व),
ता.वसई, जि.पालघर, पिन-४०१ ३०५.

दुरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com
जा.क्र : वविशम/पर्या/ 03 /२०२४
दि. : 30 /०४/२०२४.

# परिपत्रक

**विषय :-** गणेशोत्सव २०२४च्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करण्याबाबत.

**संदर्भ :-** १) मा.केंद्रिय प्रदुषण नियंत्रण मंडळाकडील दि.१२ मे २०२० रोजीच्या मार्गदर्शक सुचना
२) मा. सदस्य सचिव , महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचेकडील MPCB/JD(WPC)/B- २४०२२१-FTS-००८८, दि.२१/०२/२०२४ रोजीचे पत्र.

आगामी गणेशोत्सवांच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणाच्या संरक्षणासोबतच शाश्वत पद्धतीने पर्यावरणपूरक उत्सव साजरा करण्यासाठी वसई विरार शहर महानगरपालिका कटिबद्ध आहे.

खालील नमूद केलेली मार्गदर्शक तत्वे विशेषतः प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) मूर्तीवर प्रभावीपणे बंदी घालण्यासाठी आणि पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी निर्गमित करण्यात येत आहेत. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने दि. १२ मे २०२० रोजी जारी केलेल्या मूर्ती विसर्जनाच्या सुधारित मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे ही मार्गदर्शक तत्वे तयार करण्यात आलेली आहेत.

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील निवासी कल्याणकारी संघटना, मूर्तीकार आणि कुटुंबांना आवाहन करते की, त्यांनी उत्सवांपूर्वी, उत्सवादरम्यान व उत्सवानंतर या मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करावे, जेणेकरून उत्सवांचा पर्यावरणावर होणारा नकारात्मक परिणाम कमी होईल.

**अ) मूर्तिकार :-**

**१)** प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) आणि प्लास्टिक, थर्माकॉल (पॉलिस्टीरिन) आणि कृत्रिम रंगांपासून बनवलेल्या सजावटीच्या वस्तू यासारखे हानिकारक पदार्थ टाळणे बंधनकारक आहे.

**२)** मूर्तीकारांनी माती (विशेषतः शाडू माती) यांसारख्या पारंपरिक साहित्यांचा आणि कागदी लगदा यासारख्या पर्यावरणपूरक साहित्यांचा वापर करावा.

**३)** मूर्तिकारांनी सन २०२४ मध्ये येणाऱ्या गणेशोत्सवांसाठी किती मूर्ती तयार करावयाच्या आहेत, याची सविस्तर माहिती महानगरपालिकेला देणे आवश्यक आहे. घरगुती व सार्वजनिक मूर्ती शाडू माती किंवा इतर पर्यावरणपूरक साहित्यांपासून तयार करणे बंधनकारक आहे.

**४)** मूर्तिकारांनी शाडू माती किंवा पर्यावरणपूरक मूर्तीच्या उजव्या खांद्याच्या मागील बाजूस एक इंचाचे हिरवे वर्तुळ लावून चिन्हांकित करावे.

**५)** मूर्तिकारांनी हानिकारक रंगांऐवजी नैसर्गिक / पर्यावरणपूरक रंगद्रव्यांचा वापर करावा.

**६)** उपरोक्त सूचनांचे पालन व्हावे यासाठी महानगरपालिकेची प्रभाग समिती निहाय पथके प्रत्यक्ष तपासणी करणार आहेत.

**ब) वितरक / संग्रहक / मुर्ती विक्री केंद्रे :-**

१) प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी), थर्माकॉल/पॉलिस्टीरीन आणि हानिकारक रंगांच्या मूर्तीचे प्रदर्शन काटेकोरपणे टाळून पारंपारिक शाडू माती कागदी लगदा इ. पर्यावरणपूरक वस्तूंपासून बनविलेल्या मूर्तीचे वितरण करण्यात यावे.

२) सन २०२४ मध्ये येणाऱ्या गणेशोत्सवांसाठी किती मूर्ती साठवायच्या आहेत, याची सविस्तर माहिती वितरकांनी महानगरपालिकेला देणे आवश्यक आहे. तसेच सार्वजनिक वापरासाठी किती मूर्ती साठवल्या आहेत, याची अचूक माहिती वसई विरार शहर महानगरपालिकेच्या संबंधित प्रभाग समिती कार्यालयांना सादर करणे आवश्यक आहे.

३) वितरकांनी आपल्या मंडपाबाहेर ३ X ५ आकाराचा "येथे पर्यावरणपूरक साहित्याने (शाडू माती) बनविलेल्या मूर्ती उपलब्ध आहेत" असा फलक लावावा. प्लॅस्टिक पॅकेजिंगचा कमीत कमी वापर करुन शक्य तेथे विघटनशिल पर्यायांचा वापर करावा.

४) मूर्ती उत्पादन, विक्री आणि विल्हेवाट यासंदर्भात सर्व शासकीय नियमांचे पालन करावे.

**क) सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ :-**

१) प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी), थर्माकोल/पॉलिस्टीरीन आणि हानिकारक रंगांपासून बनविलेल्या मूर्ती खरेदी करणेत येऊ नये तसेच मूर्ती ही पारंपारिक शाडू माती, कागदी लगदा इ. पर्यावरणपूरक वस्तूंपासून बनविलेली असावी.

२) सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने बॅनर, पोस्टर आदींसह प्लॅस्टिक आधारित सजावटीचा वापर टाळून त्याऐवजी कापड,. पुनर्वापर केलेला कागद लगदा इ. पर्यावरणपूरक साहित्याने मंडप सजवावेत

३) उत्सवादरम्यान निर्माण होणारे सर्व निर्माल्याचे वर्गीकरण करुन योग्य ती विल्हेवाट लावली जाईल याची खात्री करावी.

४) सेंद्रिय (निर्माल्य) आणि नॉन-बायोडिग्रेडेबल्त वस्तूंच्या संग्रहासाठी स्वतंत्र रंगीत कोटेड डब्बे वापरावे. प्लास्टिक पिशव्या, बाटल्या, यांसारख्या सिंगल युज प्लॅस्टिकच्या वापरावर सक्त मनाई आहे.

५) सार्वजनिक गणपती मंडळांनी आपल्या आवारात महानगरपालिकेने बांधलेल्या तात्पुरत्या/कृत्रिम तलावांमध्येच मूर्तीचे विसर्जन होईल याचे नियोजन करावे.

६) ध्वनी प्रणालीचे प्रमाण मर्यादित ठेवून आणि लाऊडस्पीकरसाठी निश्चित केलेल्या वेळेचे पालन करून ध्वनी प्रदूषण नियमांचे पालन करावे.

**ड) वैयक्तिक (घरगुती) गणपती :-**

१) पीओपीनिर्मित मूर्तीऐवजी शाडू माती, कागदी लगदा किंवा इतर पर्यावरणपूरक पर्यायांपासून बनवलेल्या मूर्ती खरेदी कराव्यात.

२) शहरातील सर्व वैयक्तिक कुटुंबांनी आपापल्या आवारातील महानगरपालिकेच्या कृत्रिम तलावांमध्ये गणेश मूर्तीचे विसर्जन करणे बंधनकारक आहे.

३) निर्माल्य किंवा अविघटनशिल वस्तूंच्या संग्रहासाठी स्वतंत्र रंगीत कोटेड डब्बे वापरा.

४) उत्सवानंतर, पर्यावरणावर होणारा परिणाम कमी करण्यासाठी कागद आणि पुठ्ठयांच्या सजावटीचा जबाबदारीने पुनर्वापर किंवा विल्हेवाट लावावी. पुनर्वापर न होणाऱ्या वस्तूंपासून पुनर्वापर योग्य वस्तू वेगळ्या कराव्यात आणि स्थानिक कचऱ्याची विल्हेवाट लावण्याच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करावे.

५) प्लॅस्टिक प्रदूषण रोखण्यासाठी प्लॅस्टिकची सजावट / श्रृंगार करणे टाळावे.

**वसई विरारा शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये गणेशोत्सवासाठी पर्यावरणपूरक उपाययोजनांची अंमलबजावणी**

१) कृत्रिम (तात्पुरते) विसर्जन तलावांची निर्मिती :- महानगरपालिकेतर्फे शहरातील विविध सार्वजनिक ठिकाणी किंवा जलस्त्रोतांच्या जवळ मूर्ती विसर्जनासाठी तात्पुरते तलाव उभारले जातील. या सुविधांमध्ये कचरा संकलन

आणि साठवणुकीसाठी आवश्यक तरतुदी असतील, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक विसर्जनास प्रोत्साहन दिले जाईल.

२) कचरा संकलन व विल्हेवाट :- मूर्ती विसर्जन स्थळांमधून निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे वेळेत संकलन आणि सुरक्षित विल्हेवाट लावण्याची खात्री महानगरपालिकेमार्फत गणेशोत्सव पूर्ण झाल्यानंतर २४ तासांच्या आत करण्यात येईल.

३) कचरा विलगीकरण :- विघटनशिल आणि अविघटनशिल कचऱ्याचे संकलन आणि विलगीकरण करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत मूर्ती विसर्जन स्थळी स्वतंत्र रंगीत कोटेड डब्बे उपलब्ध करून देण्यात येतील.

४) गाळाची विल्हेवाट :- मूर्ती विसर्जनानंतर तलावातील गाळाची विल्हेवाट महानगरपालिकेमार्फत शास्त्रोक्त पद्धतीने करण्यात येईल किंवा मूर्तीकार संघटनांना पर्यायाने नवीन मूर्ती तयार करण्यासाठी गाळाचा पुनर्वापर करणे बंधनकारक केले जाईल, ज्यामुळे शाश्वत संसाधनांचा वापर होण्यास हातभार लागेल.

५) जनजागृती अभियान:- वसई विरार शहर महानगरपालिका करणार व्यापक जनजागृती मूर्ती निर्मितीसाठी नैसर्गिक, बायोडिग्रेडेबल आणि पर्यावरणपूरक कच्च्या मालाच्या वापरास प्रोत्साहन देण्याची मोहीम, प्लास्टर ऑफ पॅरिसपासून (पीओपी) बनवलेल्या मूर्तीवर पूर्णतः बंदी घालण्यात येत असून नागरिकांना पर्यावरणपूरक पद्धतींचे पालन करण्यास प्रोत्साहित केले जाणार आहे.

पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ अन्वये उत्सवादरम्यान नागरिकांनी आणि मूर्तीकारांनी पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी आणि पर्यावरणपूरक पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी उपरोक्तप्रमाणे मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक असून नियमांचे उल्लंघन केल्यास दंड आकारला जाईल.

(रमेश मनाळे)
अतिरिक्त आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका